वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-शुक्रवार दि.२ जानेवारी २०२६ पाने ४ किंमत ३

# बाबासाहेबांच्या लेकीने घेतला आज प्रथम नागरीकपदाचा पदभार

## सभागृहात मोठ्या जल्लोषात असंख्य कार्यकर्ते, नेत्यांच्या उपस्थितीमध्ये पदभार घेतल्याने पालिकेत मोठा जल्लोष साजरा

Email.- dailydivyawarta@Gmail.com
दिव्य वार्ता
Email.-editordivyawarta@gmail.com







आज न्युयॉर्कमध्ये जोहरन ममदानी यांनी महापौर पदाचा पदभार घेतला आणि आज बीडमध्ये मुजीबभाई यांच्या सासूने पदभार घेतल्याने बीडमध्ये एकच चर्चा

# न्युयॉर्कमध्ये जोहरन ममदानी अन् बीडमध्ये मुजीबभाई




## पारवेताई तुम्ही आज पदभार घेतला, तुम्हाला खुप-खुप शुभेच्छा..!

पण आता तुमच्यावर आजपासून मोठी जबाबदारी आली आहे

बीड शहराचा विकास नव्हे भकास झालेला असून आता त्यामध्ये तुम्हाला विकास करून दाखवावा लागेल

## पटेल साहेब म्हणाले, पहिले जेष्ठांचा सत्कार करा मग माझा... पण ट्रोल करणाऱ्यांनी अर्ध वाक्य घेवून ट्रोल केल्याने उलटसुलट चर्चा

# खरंतर आता अजितदादांनी पटेल साहेबांना उपनगराध्यक्ष करणे गरजेचे



### पटेल साहेबांची आमदारकीच्या तिकिटामध्ये ऐनवेळी बदल झाला

अजितदादांनी नगराध्यक्ष पदाचे आश्वासन दिले पण आरक्षणामुळे ती ही संधी हुकली, आता खरोखरच अजितदादांनी पटेल साहेबांना उपाध्यक्ष करून जनतेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची प्रतिमा उंचविण्याची जबाबदारी द्यावी,पटेल साहेबांसारखा व्यक्तींना उपनगराध्यक्ष केल्यास शहराचा विकास ही झपाट्याने मार्गी लागण्यास मदत मिळेल

# कोणतीही गोष्ट नियमबाह्य होणार नाही, जनसेवेसाठी आम्ही कटिबध्द



## बीडकरांचा विश्वास सार्थकी लावणार-आ.विजयसिंह पंडित

## जनतेमुळेच पदभार घेण्याचे भाग्य-नगराध्यक्षा प्रेमलताताई

**नगर पालिकेत कोणतीही गोष्ट नियमबाह्य होणार नाही. बीड शहर वासियांनी ज्या विश्वासाने आपल्याला भरभरून आशिर्वाद दिले आहेत, तो विश्वास सार्थकी लावणार असल्याची ग्वाही आ.विजयसिंह पंडित यांनी दिली. जनसेवेसाठी आम्ही कटीबध्द आहोत, नवनिर्वाचित नगराध्यक्ष प्रेमलताताई पारवे आणि सर्व नगरसेवक बीडकरांना अपेक्षित काम करतील असा विश्वासही आ.पंडित यांनी व्यक्त केला. नगर पालिकेवर उपमुख्यमंत्री ना.अजितदादांचे पुर्ण लक्ष असणार आहे. या पुढे लाईन दोरीत प्रशासन चालले पाहिजे, कोणतीही गोष्ट नियमबाह्य होणार नाही. जनतेच्या कामांना सर्वात आधी प्राधान्य दिले जाईल असेही आ.पंडित यांनी सांगितले तर मी आज नगराध्यक्ष पदाचा पदभार घेत आहे हे भाग्य मला बीडच्या जनतेमुळेच मिळाले आहे. यापुढे सर्वांना सोबत घेऊन बीडचा विकास होईल असा विश्वास नवनिर्वाचित नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे यांनी व्यक्त केला.**

बीड (दिव्य न्युज):- नगर पालिका निवडणूकीत विजयी झाल्यानंतर नवनिर्वाचित नगराध्यक्षा असलेल्या भिमकन्या प्रेमलताताई पारवे आज पदावर विराजमान झाल्या. आ.विजयसिंह पंडित, गटनेते फारूक पटेल,मुख्याधिकारी शैलेश फडसे, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, संपादक शेख मुजीबभाई, शिवसंग्रामचे सुहास पाटील, जेष्ठ नेते मोईन मास्टर, शेख निजाम, संपादक शेख तय्यबभाई,अमर नाईकवाडे, प्रज्ञाताई खोसरे, दिलीप गोरे, स्वप्नील गलधर, सीए बी.बी.जाधव, अशोक हिंगे, विनोद मुळूक, झुंजार धांडे, संदीप आदमाने, सय्यद नवीदुज्जमा, सादेकुजमा, सुजात देशमुख, सय्यद इलियास, वाजेद कुरेशी, संजय उडाण यांच्यासह मित्र पक्षाचे सर्व नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरीक आणि नगर पालिकेतील सर्व विभाग प्रमुख, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.



# बीडच्या मतदारांनी मोठ्या अपेक्षेने मुजीबभाई यांच्या प्रेमापोटी समाजाने भरभरून मतदान केले

## आता तुमची जबाबदारी या परिसराचा १००टक्के विकास करा

* बीड शहराला तीन दिवसाआड पाणी, रोज स्वच्छता, बंद असलेले पथदिवे हे तात्काळ सुरू करणे गरजेचे
* राजुरी वेस ते बलभिम चौक ते जुना बाजार ते चांदणी चौकापर्यंतचा सिमेंट रस्ता हा तात्काळ सुरू... करण्याची परिसरातील नागरीकांची आपल्याकडून अपेक्षा, * दर्गा हजरत शहेंशाहवली या देवस्थानचा तिर्थक्षेत्र किंवा पर्यटन विकास महामंडळाकडून निधी आणून विकास कामे करण्याची समाजाची आपल्याकडून अपेक्षा

## आता गटातटाच्या भानगडीत पडू नका, मतदारांनी तुम्हा सगळ्यांना विकास कामे करण्याची संधी दिली,आलेल्या संधीचे सोने करा, विकास काय असतो हे करुनच दाखवा

**पारवेताई बीड शहरात मोठा वॉटरपार्क, उद्यान, आपण अजितदादांकडून मंजूर करून घ्यावा त्यासाठी बार्शी रोडवरील शासकीय दुध डेअरीची १५ एक्कर जागा अजितदादांकडून मागून घ्यावी**

**आ.विजयसिंह पंडित म्हणाले की पाणी पुरवठा योजनेवर महावितरणकडून महिन्याकाठी ६०-७० लाखांचे बिल येते, आपल्याला सौर ऊर्जाचे प्रकल्प आणावे लागेल**

## आहो, आमदार साहेब ही योजना पाच वर्षापुर्वीच मंजुर ही झाली, शासनाने ६-७ कोटी रुपये यासाठी मंजूर केले पण त्या नालायक महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी या योजनेचा बट्ट्याबोळ केला, चक्क चार वर्षापुर्वीच ४-५ कोटींच्या आसपास मोठी रक्कम ठेकेदाराला काम न करताच देवून टाकले

**आहो, आमदार साहेब या हरामखोर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी बीडची अमृत पाणी पुरवठा योजना आणि भुयारी गटार योजनेचा बट्ट्याबोळ केला**

आमदार साहेब, तुम्हाला खरोखरच बीड शहराची काळजी असेल तर सर्व प्रथम अजितदादांना सांगून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता गजानन खराटे आणि शाखा अभियंता अर्शद यांची तात्काळ बीडमधून हकालपट्टी करावी आणि या विभागाला कायम स्वरूपी कार्यकारी अभियंता द्यावा

## अमरनानांच्या डॅशींग भाषणामुळे अनेकांना घामच फुटला



नाना काहीही चुकचे म्हणले नाही, ते ज्या पक्षाचे ते त्याच पक्षाबद्दल बोलणार, यामध्ये चुक काय?

## आधी ५ सभांना गैरहजर, आता अजितदादा पवारांच्या दौऱ्यालाही धनुभाऊंची दांडी

# दिल्लीतील भेटीमुळे चर्चांना उधाण

**बीड, (दिव्य न्युज):- महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि बीडचे पालकमंत्री अजित पवार हे गुरुवारी दुपारी बीडच्या दौऱ्यावर येत आहेत. दुपारी दीड वाजता अजित पवार यांचे बीडमध्ये आगमन होणार असून बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणावर आयोजित कार्यक्रमाला ते उपस्थित राहणार आहेत. या ठिकाणी विविध विकास कामांची प्रशासकीय मान्यता वाटप केली जाणार आहे. आदर्श शिक्षकांचा गौरव देखील केला जाणार आहे. यानंतर बीडमधील सहकार भवनाचं भूमीपूजनही केलं जाणार आहे.**



दरम्यान, नव्या वर्षाच्या पहिल्या दिवशी अजित पवार हे बीडमध्ये येत असताना परळीचे आमदार धनंजय मुंडे मात्र या कार्यक्रमास उपस्थित राहणार नाहीत. अजित पवार यांचा दौरा अचानक ठरलेला असल्याने आणि माझे पूर्वनियोजित कार्यक्रम असल्याने मी या दौऱ्याला उपस्थित राहू शकणार नाही, अशी माहिती आमदार धनंजय मुंडे यांनी फेसबूक पोस्टद्वारे दिली आहे.

धनंजय मुंडे यांच्या या पोस्टनंतर आता विविध चर्चांना उधाण आलं आहे. कारण अजित पवारांच्या दौऱ्याला गैरहजर राहण्याची धनंजय मुंडेंची ही पहिलीच वेळ नाही. या पूर्वी नगरपालिका निवडणुकीच्या वेळी अजित पवारांनी बीड जिल्ह्यात एकूण पाच सभा घेतल्या होत्या. या प्रत्येक सभेवेळी धनंजय मुंडे गैरहजर राहिले होते. आता नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी धनंजय मुंडेंनी अचानक अजित पवारांच्या दौऱ्याला दांडी मारली आहे.

धनंजय मुंडेंनी अलीकडेच दिल्लीत जाऊन केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांची भेट घेतली होती. संतोष देशमुख खून प्रकरणात अडचणीत सापडलेल्या नेत्याने अशाप्रकारे अमित शाहांची भेट घेतल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या. आता या भेटीचं आणि अजित पवारांच्या दौऱ्याशी जोडलं जात आहे.

धनंजय मुंडे फेसबूक पोस्टमध्ये म्हणाले, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री आदरणीय अजित दादा पवार यांचे नवीन वर्षानिमित्त बीड जिल्ह्यामध्ये हार्दिक स्वागत. मागील दोन-तीन दिवसांमध्ये आदरणीय अजितदादांचा बीड जिल्हा दौरा नियोजित होता. मी यात पूर्णवेळ उपस्थित राहणार होतो. मात्र काही कारणांनी मागील दोन तीन दिवसांतला तो दौरा रद्द करण्यात आला.आज नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी आदरणीय अजितदादा यांचा बीड दौरा ऐनवेळी ठरवण्यात आला असून माझ्या पूर्वनियोजित कार्यक्रमांमुळे मी बीड जिल्ह्यात या दौऱ्यात उपस्थित नाही, याबाबत अजितदादा यांच्यासह पक्षश्रेष्ठींना कल्पना दिली आहे. सर्व प्रकारच्या माध्यमांना माझी विनंती आहे, कृपया याबाबतीत कोणताही गैरसमज होईल, अशा बातम्या प्रसिद्ध करू नयेत..., असं धनंजय मुंडे म्हणाले.





# ग्रामीण भागातील ९-१० वीच्या विद्यार्थ्यांनी तयार केल्या स्वत:च्या वेबसाईट्स

## लातूर जिल्ह्यात डिजिटल शिक्षणाची नवी सुरुवात

लातूर, (दिव्य न्युज):- जिल्ह्यातील औसा तालुक्यातील श्री गणेश विद्यालय, उजनी (ता. औसा, जि. लातूर) येथील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी डिजिटल शिक्षणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत स्वतःच्या वेबसाईट्स तयार केल्या आहेत.

१.5GB - Online Learning Platform(www.gbstudy.in) या Ed-Tech कंपनी च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वेब डेव्हलपमेंट व आधुनिक AI आधारित कोडिंगचे प्रशिक्षण देण्यात आले.

या प्रशिक्षणात सहभागी झालेल्या सार्थक वाघमारे, अमृता वाघमारे आणि इराम रुईकर या विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम पूर्ण करून स्वतःचे प्रोजेक्ट यशस्वीरीत्या सादर केले.

अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना शाळेतच प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक कोपरकर सर, पर्यवेक्षक ठाकूर सर तसेच विज्ञान शिक्षक टापरे सर उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक करत अशा आधुनिक शिक्षण उपक्रमांना प्रोत्साहन देण्याची गरज व्यक्त केली.



या प्रसंगी १.5GB - Online Learning Platform चे संस्थापक मोहम्मद पांजेशा व आरेफ मन्यारी यांनी सांगितले की,

आज जगातील अनेक प्रगत देशांमध्ये पहिलीपासूनच कोडिंग आणि AI शिक्षण अनिवार्य करण्यात आले आहे. आमचे उद्दिष्ट लातूर जिल्ह्यातील प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच दर्जाचे आधुनिक, AIआधारित आणि कौशल्याधिष्ठित शिक्षण उपलब्ध करून देणे आहे. यासाठी शासनाची साथ आणि मार्गदर्शन अत्यंत महत्त्वाचे आहे.

# केळ येथे सरपंच सचिन दळवी यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा

दौलावडगाव , (दिव्य न्युज):- आमदार सुरेश धस यांचे कट्टर समर्थक व केळ ग्रामपंचायतचे सन्माननीय सरपंच श्री. सचिन दळवी उर्फ हरी तात्या यांनी आपला वाढदिवस दि. १ जानेवारी २०२६ रोजी सामाजिक भान जपत आगळ्या-वेगळ्या पद्धतीने साजरा केला.

या निमित्ताने त्यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा केळ तसेच कोहोकवस्ती शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांसोबत आपला वाढदिवस साजरा करत समाजासमोर आदर्श निर्माण केला. यावेळी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य (वही, पेन) तसेच खाऊचे वाटप करण्यात आले.याचबरोबर पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत शाळेच्या प्रांगणात आंबा, चिकू व विविध शोभेची झाडे



लावून वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणासोबतच पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण होईल, असे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले.

या सामाजिक उपक्रमाबद्दल शाळेच्या वतीने सरपंच सचिन दळवी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी दौलावडगावचे सामाजिक कार्यकर्ते श्री महादेव कोहक यांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.केळ ग्रामस्थांच्या वतीने आदरणीय सिध्देश्वर ढोले यांनी आपले मनोगत व्यक्त करत सरपंचांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या व त्यांच्या सामाजिक कार्याचा गौरव केला.या कार्यक्रमास गावातील बहुसंख्य तरुण, ग्रामस्थ व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन उपसरपंच श्री. संतोष सर यांनी केले.

सामाजिक जाणीव, शिक्षणप्रेम आणि पर्यावरण संवर्धन यांचा सुरेख संगम असलेला हा वाढदिवस सोहळा केळ गावासाठी प्रेरणादायी ठरला, अशी प्रतिक्रिया ग्रामस्थांमधून उमटत आहे.

# जिंतूर तहसीलदारपदी शितल कच्छवे यांनी पदभार स्वीकारताच कार्यालयीन शिस्त व जनतेच्या कामांना गती

जिंतूर , (दिव्य न्युज):- महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या आदेशानुसार नायब तहसीलदार संवर्गातून तहसीलदार संवर्गात तदर्थ पदोन्नती मिळालेल्या श्रीमती शितल कच्छवे यांनी जिंतूर तहसीलदार म्हणून पदभार दिनांक २२ डिसेंबर २०२५ रोजी स्वीकारला आहे. पदभार स्वीकारताच त्यांनी तहसील कार्यालयातील प्रमुख अधिकारी व कर्मचाऱ्यांची बैठक घेऊन कार्यालयीन शिस्त, स्वच्छता आणि वेळेवर उपस्थितीबाबत सक्त सूचना



दिल्या.

तहसीलदार कच्छवे यांच्या स्पष्ट निर्देशांमुळे तहसील कार्यालयातील कर्मचारी वेळेत हजर राहू लागले असून कार्यालयीन कामकाजात शिस्त व कार्यक्षमता वाढल्याचे चित्र दिसून येत आहे. कार्यालय परिसराची स्वच्छता, अंतर्गत व्यवस्थेतील सुधारणा तसेच आवश्यक त्या कर्मचाऱ्यांच्या फेरबदलामुळे प्रशासन अधिक गतिमान झाले आहे.जिंतूर तहसील कार्यालयात प्रलंबित असलेल्या नागरिकांच्या महसुली कामांना गती मिळाली असून उत्पन्न दाखले, रहिवासी प्रमाणपत्रे, सातबारा दुरुस्ती, फेरफार आदी कामे जलद गतीने पूर्ण होत आहेत. त्यामुळे तालुक्यातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे.नवीन तहसीलदारांच्या कार्यपद्धतीमुळे जिंतूर तालुक्यातील प्रशासन अधिक लोकाभिमुख, पारदर्शक व कार्यक्षम राहील, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.





# नगराध्यक्षा पारवेताईंनी मुलभूत सेवासुविधा प्राधान्याने सोडवाव्यात- सौ. जयश्री विधाते



बीड , (दिव्य न्युज):- गेली अनेक वर्ष सामान्य बीडकर स्वच्छता-वीज-पाणी या मुलभूतभूत सेवासुविधा पासुन वंचित राहिला असुन सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य घटक असलेल्या स्वच्छता-वीज आणि पाणी याचा नियोजन पुर्ण कृती आराखडा तयार करुन. आठ दिवसाला वेळापत्रका नुसार स्वच्छ व मुबलक पाणी, मुख रस्त्यासह वस्ती तेथे लाईट, उघड्या डीपी लोंबकळणाऱ्या तारा, रस्त्यात अडवे आलेले, नालीत असलेले आणि झुकलेले खांब यांची तात्काळ दुरुस्ती किंवा प्रत्यारोपण. प्रत्येक वार्डासाठी स्वतंत्र घंटागाडी घर तेथे घंटागाडी पोहचली पाहिजे . नागरी वस्त्यात सकाळी तर बाजारपेठेत सकाळ संध्याकाळ नियमित आली पाहिजे. या मुलभूत सेवासुविधासह रस्ते नाल्यांची साफसफाई तसेच ओपन स्पेस स्वच्छता करुन कचरा टाकण्यास र्निबध लादणे.या कामाना प्राधान्यक्रम देऊन नवनिर्वाचित नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे यांनी आदर्श पायंडा पाडत सर्वसामान्य कुटुंबातील अनुसूचित जाती जमातीतील महिले प्रती बीडकरांनी दाखवलेला विश्वास सार्थ ठरवावा.राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री जिल्हयाचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वात सहकारी नगरसेवक आणि रा. कॉ. पक्ष अजित दादा गटाचे आमदार विजयराजे पंडीत यांच्या सहकार्यातून आदर्श नगरपालीका बीडच्या दिशेने मार्गक्रमण करावे असा आशावाद मा. सभापती सौ. जयश्री विलास विधाते व्यक्त केला.

# महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन सप्ताहानिमित्त अंभोरा पोलीस स्टेशन हद्दीत विविध जनजागृती उपक्रम

दौलावडगाव , (दिव्य न्युज):- महाराष्ट्र पोलीस दलाच्या वर्धापन दिनानिमित्त दिनांक ०२ जानेवारी २०२६ ते ०८ जानेवारी २०२६ या कालावधीत अंभोरा पोलीस स्टेशन हद्दीत महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन सप्ताह साजरा करण्यात येत आहे. या सप्ताहाच्या निमित्ताने पोलीस-जनता नाते अधिक दृढ करणे, नागरिकांमध्ये सुरक्षिततेबाबत जनजागृती निर्माण करणे तसेच गुन्हे प्रतिबंधासाठी समाजाचा सक्रिय सहभाग वाढविणे, या उद्देशाने विविध जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.या उपक्रमांतर्गत नागरिक संवाद कार्यक्रम, सायबर गुन्हे व ऑनलाईन फसवणूक प्रतिबंधाबाबत जनजागृती, वाहतूक व रस्ता सुरक्षा मार्गदर्शन, महिला व बालसुरक्षा विषयक प्रबोधन, युवकांसाठी व्यसनमुक्ती मार्गदर्शन, 'हर घर उउढत' संकल्पना, स्वच्छता अभियान तसेच विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत.या सर्व उपक्रमांद्वारे भयमुक्त समाज - सुरक्षित नागरिक हा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येत असून, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नागरिकांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



महाराष्ट्र पोलीस दल हे केवळ कायद्याची अंमलबजावणी करणारे नसून, समाजाच्या सुरक्षिततेसाठी सदैव कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन यावेळी करण्यात आले. या वर्धापन दिन सप्ताहाच्या माध्यमातून पोलीस-जनता यांच्यातील विश्वास अधिक दृढ होईल, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला आहे.

# भिमराव धोंडे यांच्या हस्ते डॉ.राजेंद्र सानप यांना राज्यस्तरीय गंगाई-बाबाजी पुरस्कार प्रदान

बीड, (दिव्य न्युज):- सामाजिक,राजकीय, ग्रंथालय ,धार्मिक,क्षेत्रात गेल्या ३५वर्षापासुन कार्यरत असलेले ग्रंथालय चळवळीत स्वतःला वाहून घेणारे बीड जिल्हा ग्रंथालय संघाचे माजी अध्यक्ष, मराठवाडा विभागीय ग्रंथालय संघाचे माजी कोषाध्यक्ष,महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे संचालक डॉ.राजेंद्र सानप यांना मा.आ. भिमराव धोंडे साहेब यांच्या हस्ते राज्यस्तरीय सन २०२५-२०२६ चा राज्यस्तरीय गंगाई-बाबाजी आदर्श पुरस्कार आष्टी येथे गुरुवारी दि.१ जानेवारी २०२६ रोजी भगवान महाविद्यालय येथे गंगाई बाबाजी उत्सव कार्यक्रमात देण्यात आला.



बीड जिल्हात शासनाच्यागाव तिथे ग्रंथालय!या धोरणानुसार गावा गावात ग्रंथालय चळवळ उभारावी यासाठी ३५ वर्षापासुन सक्रीय सहभाग घेणारे सार्व ग्रंथालयाच्या विविध प्रलंबित प्रश्नावर जन आंदोलन करणारे आंदोलक वृत्तपत्रात विविध विषयांवर लेख लिहिणारे २ पुस्तके प्रकाशित असलेले साहित्यिक डॉ.राजेंद्र सानप यांना सन २०२५-२०२६ चा राज्यस्तरीय गंगाई-बाबाजी आदर्श पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.या पुरस्कार वितरण कार्यक्रमास माजी मंत्री जेष्ठ नेते शिवाजीराव पंडित,प्रा सुशीलाताई मोराळे,मा आ राजेंद्र जगताप,सौ दमयंतीताई धोंडे, राजेश धोंडे,युवा नेते अजय धोंडे,सुभाषचंद्र सारडा,दिपक घुमरे यांच्या सह असंख्य मान्यवरांची उपस्थिती होती.या पुरस्काराबद्दल डॉ राजेंद्र सानप यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे..

## उपमुख्यमंत्री अजित पवारांची खासदार बजरंग सोनवणेंना लिफ्ट

# हेलिकॉप्टरमधून एकत्र प्रवासाने नवा ट्विस्ट

## बीडचे राजकारण बदलणार ?

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार बजरंग सोनवणे यांच्या नेतृत्वात नगरपंचायत निवडणूक लढण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने धारुर व माजलगावमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या नाकी नऊ आणले. तर, माजलगावमध्ये त्यांनी सत्ताही मिळवली. गुरुवारी अजित पवार हे बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. त्यांनी या दौऱ्यात खासदार बजरंग सोनवणेंनी पवारांच्याच हेलिकॉप्टरमधून लिफ्ट घेतली. त्यामुळे राजकीय वर्तुळात वेगळ्याच चर्चा सुरू झाल्या आहेत.

अजित पवारांनी पंडितांच्या शिवछत्र निवासस्थानी नाष्टा केला. नाष्ट्याच्या टेबलवर पवारांसोबत आमदार सोळंके, माजी आमदार अमरसिंह पंडित, अंबा कारखान्याचे अध्यक्ष रमेश आडसकर, माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी आदी नेत्यांसोबत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सहाल चाऊस व मोहन जगताप हे देखील होते. यांच्या नेतृत्वाखालील उमेदवाराने आमदार प्रकाश सोळंके यांचे होमटाऊन माजलगावमध्ये त्यांच्या नेतृत्वाखालील नगराध्यक्षाच्या उमेदवाराचा पराभव केला


▶▶ पान २ वर

### आमचं चागलं चाललंय...



अजित पवार यांच्या कार्यक्रमाला मंत्री पंकजा मुंडे, धनंजय मुंडे, आमदार नमिता मुंदडा, धनंजय मुंडे अनुपस्थित होते. त्यावरून त्यांना प्रश्न विचारला असता ते म्हणाले, अनुपस्थितीवरुन माध्यमांनी फुकट चर्चा करु नये. एक जानेवारीला लोक कुटूंबासोबत फिरायला जातात. मला धनंजय मुंडेंनी अगोदरच तसे सांगितलेले आहे. तसेच आमचं चांगल चाललंय अशी टिपण्णीही केली.





### “ टेबलवर सोळंके, चाऊस आणि जगतापही “

बीडला आलेल्या अजित पवारांनी पंडितांच्या शिवछत्र निवासस्थानी नाष्टा केला. या टेबलवर पवारांसोबत पक्षाचे आमदार सोळंके, माजी आमदार अमरसिंह पंडित, अंबा कारखान्याचे अध्यक्ष रमेश आडसकर, माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी आदी नेत्यांसोबत चाऊस, जगतापही होते.विशेष म्हणजे सोळंके, चाऊस, जगताप यांनी एकमेकांची चेष्टा मस्करी करत नाष्टा घेतला. त्यानंतर पवार हेलिकॉप्टरने परतीच्या प्रवासाला निघाल्यानंतर सोबत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार बजरंग सोनवणेही होते. सुरुवातीच्या पवारांच्या विकास कामांच्या कार्यक्रमाला सोनवणेंची हजेरी लोकप्रतिनिधी म्हणून सहाजिकच होती. पण, हेलिकॉप्टर लिफ्टने चर्चांना वाव दिला आहे.

# जुनी भांडणं काढत कुऱ्हाडीने हल्ला

## मध्यस्थी करणाऱ्याच्या मांडीवर हातोड्याचे घाव

बीड, (दिव्य न्युज):- बीड जिल्ह्याच्या अंबाजोगागाई तालुक्यातील अंबासाखर कारखाना परिसरात २९ डिसेंबर रोजी सकाळी साडेसात वाजता जुन्या भांडणाची कुरापत काढून एका तरुणावर कुऱ्हाडीने जीवघेणा हल्ला करण्यात आला. समीर सिकंदर पठाण असे आरोपीचे नाव असून त्याने धनराज ओमप्रकाश कांबळे याच्या डोक्यात कुऱ्हाडीने वार करून त्याला जिवे मारण्याचा प्रयत्न केला.

या हल्ल्यात धनराज गंभीर जखमी झाला असून त्याला वाचवण्यासाठी आलेल्या अक्षय परमेश्वर कणसे या मध्यस्थालाही आरोपीने लोखंडी हातोड्याने मारहाण केली. या प्रकरणी अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला अटक करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आंबा साखर कारखाना परिसरात गणेश गाळुंके यांच्या चप्पलाच्या दुकानासमोर ही हिंसक घटना घडली. आरोपी समीर पठाण आणि धनराज कांबळे यांच्यात जुना वाद होता. याच वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. आरोपीने संतापून जवळ असलेल्या कुऱ्हाडीने धनराजच्या डोक्यात वार केले, ज्यामुळे तो रक्ताच्या थारोळ्यात कोसळला. सध्या धनराजवर रुग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून

▶▶ पान २ वर



सिल्लोड : शहरातील सेनाभवन येथील माजी मंत्री आ.अब्दुल सत्तार यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार करतांना माजी नगरसेवक हाजी मतिन देशमुख, शब्बीर पटेल आदी (छाया-शेख अफसर, सिल्लोड)

## वडवणी वकील संघाच्या अध्यक्षपदी ॲड.टि.आर.आडे,सचिवपदी ॲड.बी.डी.उजगरे यांची निवड





वडवणी , (दिव्य न्युज):- वडवणी वकील संघाच्या वार्षिक निवडणूक कार्यक्रम २०२६ या वर्षांकरिता झालेल्या निवडणुकीत अध्यक्षपदी ड.टि.आर.आडे,व उपाध्यक्षपदी ड.के.डी.काळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.सचिवपदी ड.बी.डी.उजगरे हे एका मताने विजयी झाले.या निवडीचे वडवणी वकील संघाच्या सर्व जेष्ठ व कनिष्ठ सहकाऱ्यांनी सत्कार करून पेढे वाटुन शुभेच्छा दिल्या.

यावेळी वडवणी वकील संघाचे जेष्ठ सदस्य ड.बी.बी.आंधळे ड.पि.के. तिडके, ड. बी. के. तिडके, ड.प.व्ही.तिडके, ड.एस.ए.शेख, ड. पी. एस.उजगरे, ड. एस. पी. डोंबाळे, ड. डी. जे. चव्हाण, ड. एम. डी. गदळे, ड. एस. एस, अवचर, ड. एम.बी.आडे यांच्यासह असंख्य वकील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वडवणी वकील संघाची दरवर्षी होणारी सार्वत्रिक निवडणूक ही प्रत्येक वर्षाच्या शेवटी म्हणजे ३१ डिसेंबर रोजी घेण्यात येते. वकील संघाचा कार्यकाळ हा एक वर्षाचा असतो. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात ज्येष्ठ वकिलांच्या मार्गदर्शनाखाली ही निवडणूक पार पाडली जाते.

▶▶ पान २ वर

## प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आणि जनजागृतीसाठी पाटोदा बस आगारात सुरक्षितता अभियानाचे उद्घाटन

पाटोदा , (दिव्य न्युज):- दरवर्षी प्रमाणे नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी आज पाटोदा बस आगारात सुरक्षितता अभियानाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात बस आगार व्यवस्थापक श्री संतोष डोके साहेब, सहाय्यक वाहतूक अधीक्षक श्री विकास खेडकर साहेब, तर प्रमुख पाहुणे म्हणून सौताडा हायस्कूलचे बाळासाहेब दहिफळे सर, जरेवाडी येथील आदर्श शाळेचे श्री प्रवीण काळूसे सर, तांबाराजुरी हायस्कूलचे रामदास निंगुळे सर, सामाजिक कार्यकर्ते दत्ता भाऊ





देशमाने उपस्थित होते.

या अभियानाच्या उद्घाटनाच्या निमित्ताने प्रमुख पाहुणे दहिफळे सर, निंगुळे सर, दत्ता देशमाने आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष आगार व्यवस्थापक श्री डोके साहेब यांनी सुरक्षित अभियानाचे महत्व व गरज, वाढत्या अपघातांची कारणे आणि उपाय, बसचालकांचे आरोग्य व प्रवाशांची सुरक्षितता , बसचालक व वाहकांची जबाबदारी, भुमिका व अडचणी , बसप्रवाशांचे अपेक्षित सहकार्य व जागृती, एस टी महामंडळातील शासकीय योजनांचे प्रवाशी व संबंधित अडचणी तसेच रस्त्यांवरील इतर वाहनचालकांनी वाहतूकीचे

▶▶ पान २ वर

## जिंतूर येथे शौर्यदिनी मानवंदना



जिंतूर, (दिव्य न्युज):- आज दि.०१ जानेवारी २०२६ रोजी भारतीय बौद्ध महासभा प्रणीत समता सैनिक दल जिंतूर यांनी तालुकाध्यक्ष मोहन घनसावंत यांच्या मार्गदर्शनाखाली व महिला तालुकाध्यक्ष सुनिताताई पाटिल यांच्या अध्यक्षतेत जितूर नगर परिषद परिसरात असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यासमोर भीमा कोरेगाव येथील शौर्य स्तंभाची प्रतिकृती उभारून समाता सैनिक दल प्रमुख मेजर महेन्द्र बनसोडे, सि आर पि फ जवान आतिष जाधव व समता सैनिक दलाच्या वतिने मानवंदना देण्यात आली. त्याअगोदर माजी तालुकाध्य बौद्धाचार्य शिवाजी लाटे यानी धम्मध्वज वंदना घेतली.बौद्धाचार्य विकास अण्णा मोरे,बौद्धाचार्य राजेंद्र घनसावध याच्या पंचशील

▶▶ पान २ वर

## हाफ़ीज़ ए कुरआन कडून एस.एम.युसूफ़ यांचा सत्कार



बीड , (दिव्य न्युज):-शहरातील मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी पत्रकारिता क्षेत्रात बारा वर्षे (एक तप) पूर्ण केल्याबद्दल त्यांचा हाफ़ीज़ ए कुरआन मन्सूर साहब यांनी शाल, पुष्पहाराने हृदयी सत्कार केला. यावेळी फॅन्सी कलेक्शनचे संचालक शेख फ़ानूस, बाबुभाई आणि आऊटफिट टेलरिंग शॉप चे संचालक सय्यद जुबेर यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी बोलताना हाफ़ीज़ मन्सूर म्हणाले, गेल्या १२ वर्षांपासून आपल्याकडून सुरू असलेली निष्पक्ष, निर्भीड, परखड पत्रकारिता यापुढेही समाजातील प्रत्येक घटकासाठी, प्रश्नांसाठी सदैव अशीच चालू राहू द्यावी. अल्लाह आपल्याला सदैव निरोगी, तंदुरुस्त ठेवो. अशी कामना केली. एस.एम.युसूफ़ म्हणाले, पत्रकारिता क्षेत्रात एक तप पूर्ण केल्यानंतर पहिलाच सत्कार एका हाफ़ीज़ ए कुरआन कडून होतोय, हा माझ्यासाठी निश्चितपणे मोठा भाग्याचा क्षण आहे.

## गणपत खेडकर यांचा सेवापुर्ती सोहळ्याचा कार्यक्रम उत्साहात

### प्रामाणिकपणा तसेच कर्तव्यनिष्ठ सेवेतून जनतेचा विश्वास संपादन करणारे एसटी वाहक म्हणून त्यांची ओळख

चकलांबा, (दिव्य न्युज):- राज्य परिवहन महामंडळ (एसटी) मध्ये वाहक म्हणून प्रदीर्घकाळ प्रामाणिक, कर्तव्यनिष्ठ व जनतेशी आपुलकीने सेवा बजावणारे श्री. गणपत रुखमानंद खेडकर यांचा सेवापूर्ती सोहळा आज दि. १ जानेवारी २०२६ रोजी छत्रपती शिवाजी माध्यमिक विद्यालय येथे सायं. ७ वा.सन्मानपूर्वक आणि आनंदमय वातावरणात पार पाडला. तसेच,गेवराई आगार येथे दि.३१डिसेंबर २०२५ बुधवार रोजी श्री.गणपत रूखमानंद खेडकर (गणू आबा) हे सेवानिवृत्त झाले.त्या अनुषंगाने गेवराई आगार येथे श्री. गणपत खेडकर यांचा सह पत्नी सहपरिवारसह चांगला मोठा कार्यक्रम ठेवून गेवराई

▶▶ पान २ वर



## नवनिर्माण प्राथमिक शाळेत आनंदनगरी उपक्रम उत्साहात

पाटोदा , (दिव्य न्युज):- पाटोदा शहरातील नवनिर्माण प्राथमिक शाळा, पाटोदा येथे आज बुधवार दिनांक ३१/१२/२५ रोजी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आनंदनगरी हा उपक्रम मोठ्या उत्साहात राबविण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत शाळेच्या परिसरात एक लहानशी बाजारपेठ उभारण्यात आली होती. या बाजारपेठेत विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेले खाण्याचे विविध पदार्थ विक्रीस ठेवले होते.

वडापाव, भजी, पोहे, लिंबू सरबत, पाव भाजी,चायनीज पदार्थ, डोसे इडली सांभार, सामोसे इत्यादी पदार्थ विद्यार्थ्यांनी स्वच्छता व नीटनेटकेपणा पाळून तयार केले होते. यासोबतच बाजारातील ताजा भाजीपाला विक्रीस ठेवण्यात आला होता.ऊस, तुरीच्या शेंगा, थेट रानातून आणलेले गाजर यांचे स्वतंत्र स्टॉल लावण्यात



आले होते.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना व्यवहारज्ञान, आर्थिक नियोजन, वेळेचे महत्त्व तसेच संघभावना यांचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. ग्राहकांशी नम्रपणे बोलणे, दर ठरवणे, खरेदी-विक्री करणे व हिशोब ठेवणे हे उपयुक्त धडे विद्यार्थ्यांनी आत्मसात

▶▶ पान २ वर

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०